# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V Issue I | ISSN 2394-207X (Print) IMPACT FACTOR : 4.205 | January 2018

A Galaxy of Scholars

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

354

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | उत्तरआधुनिक कादंबरी आणि मराठी वाचनव्यवहार | [1] प्रा. अविनास हुंबरे<br>[2] प्रा. गजानन भोसले | 99-104 |
| 28 | वाचन संस्कृतीच्या विकासात ग्रंथालयाचे योगदान | प्रा. डॉ. मुतवल्ली मैजोद्दीन मैनोद्दीन | 105-108 |
| 29 | वाचनसंस्कृती विकासात ग्रंथालयांची बदलती भूमिका | प्रा. कल्पना नारायण गावडे | 109-111 |
| 30 | वाचन संस्कृती चळवळ विकासासाठीचे विविध उपक्रम | डॉ ह. सो. बिडवे | 112-115 |
| 31 | वाचनसंस्कृती आणि माहिती तंत्रज्ञान | डॉ. राजेंद्रसिंग देवरे | 116-117 |
| 32 | मानवी जीवनात वाचनाचे महत्व | [1] प्रा. सुवर्णा खोडदे<br>[2] डॉ. शारदा कदम | 118-121 |
| 33 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | प्रा मिनाक्षी गोणारकर | 122-124 |
| 34 | वाचन संस्कृती आणि बदलत्या अभिरूचीत प्रसारमाध्यमांचे मानवी जीवनातील स्थान | डॉ. नानासाहेब पवार | 125-128 |
| 35 | छंद वाचणाचा पाया समृध्द जीवनाचा | प्रा. निता शिंदे | 129-130 |
| 36 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | भगवान केशव गावित | 131-133 |
| 37 | वाचन संस्कृती आणि माहिती तंत्रज्ञान एक अभ्यास | डॉ. जी. आर. पवार | 134-135 |
| 38 | ग्रंथालये व वाचनसंस्कृतीचा विकास | [1] प्रा. एकनाथ शिवाजी झावरे<br>[2] प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर | 136-137 |
| 39 | वाचन संस्कृति का विकास और व्यंग्य | प्रा. रसाळ आर. एस. | 138-140 |
| 40 | वाचन संस्कृती विकासातील ग्रंथालयाची भूमिका | डॉ. कुंभार कल्याण निलाप्पा | 141-145 |
| 41 | ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञान वापराच्या बदलाचे व्यवस्थापन व ग्रंथपालांचे कौशल्य | दत्तात्रय शामराव पाटील | 146-150 |
| 42 | वाचनाचे महत्त्व व गरज आणि ग्रंथालयाची भूमिका | मनिषा निमराज जाधव | 151-153 |
| 43 | एकविसाव्या शतकात वाचनाभिरूची निर्माण करण्यात शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका | प्रा. मंगेश वामनराव वागदे | 154-156 |
| 44 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. प्रज्ञा अनिल भोसेकर | 157-159 |
| 45 | वाचन कौशल्य : तंत्र आणि प्रकार | प्रा. तुकाराम चव्हाण | 160-162 |
| 46 | वाचन संस्कृतीच्या विकासात ग्रंथालयाची भूमिका | आदिनाथ गोपीनाथ दरंदले | 163-164 |
| 47 | वाचन संस्कृती महत्व, तंत्र व उपाययोजन | ए. बी. आनंदकर | 165-169 |
| 48 | वाचन संस्कृती.. समाज..वास्तव | डॉ. सीमा काळभोर | 170-172 |
| 49 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | उमेश मारुती सिरसट | 173-174 |
| 50 | वाचन संस्कृतीचा विकास | डॉ. प्रीती पाटील | 175-178 |
| 51 | वाचनसंस्कृती आणि माहिती तंत्रज्ञान | आशा चंद्रशोक जिरगे | 179-181 |
| 52 | संगणकीकृत ग्रंथालयातील वाचनाचे कौशल्य आणि तंत्र | [1] आशा मोतीराम कांबळे<br>[2] वीना म. कांबळे | 182-183 |
| 53 | वाचन संस्कृतीचा विकास | आरती ज्ञा. बोराडे | 184-187 |




355

VOLUME-V (I) Impact Factor: 4.205 ISSN (Print): 2394-207X
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

# ग्रंथालये व वाचनसंस्कृतीचा विकास

[1]प्रा. एकनाथ शिवाजी झावरे (ग्रंथपाल)
[2]प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर (सहयोगी प्राध्यापक)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध पुणे.

**प्रास्ताविकः** भाषेची श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही मूलभूत अशी चार कौशल्ये आहेत. श्रवण व वाचन ही ज्ञानग्रहणाची तर भाषण व लेखन ही ज्ञान प्रकटीकरणाची कौशल्ये आहेत. श्रवण व वाचन कौशल्यामुळे माणूस बहुश्रुत होतो. वाचन ही तशी मानसिक स्वरूपाची प्रकिया आहे. वाचन ही एक गुंतागुंतीची प्रकिया आहे. केवळ छापील मजकूर वाचता येणे म्हणजे वाचन नव्हे. तर त्या मजकुराचा अर्थ समजणे फार महत्त्वाचे असते. शब्द वाचणे, त्यांचा अर्थ समजणे ही वाचनाची पहिली पायरी आहे. त्यानंतर विविध शब्द एकत्र येऊन वाक्य तयार होते

**ग्रंथालय महत्त्वः** ग्रंथ हेच गुरु व ग्रंथ हेच खरे मित्र. जो ग्रंथांच्या संगतीत असतो तो कधीही एकटा नसतो. ग्रंथ वाचनातून दूरदृष्टीचा विकास होतो, ज्ञानात भर पडते, सुसंस्कृत व पारदर्शक अशा मनाची जडणघडणही होते. ग्रंथालयात विविध प्रकारची ग्रंथसंपदा असते. ललित साहित्य, संत साहित्य, समीक्षा, लोकसाहित्य, विज्ञान, अध्यात्म, धार्मिक, आरोग्य, इतिहास, भूगोल, संस्कृती, स्पर्धापरीक्षा, संगणक इ. विषयक ग्रंथावरोबरच विविध वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, दिवाळी अंक इ. विपुल साहित्यही ग्रंथालयात असते. पुस्तकांच्या संगतीत दिवस कसा जातो तेही समजत नाही.

लेखकाला वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्यही ग्रंथालयाच्या माध्यमातून होते. एक दुवा म्हणूनच ते लेखक व वाचक यांच्यात कार्य करतात. 'शहाणे करून सोडावे सकळजन' हे जणू बीदवाक्य उराशी ठेवून ग्रंथालये कार्यरत असतात. ज्ञानलालसा वैचारिक जडणघडण मनाला चालना वज्ञानदानाचे कार्य ग्रंथालयामार्फत होते. भारतातील आजचा युवक अनेक आवर्तनात सापडला आहे. दैवशरणता, प्रवाहपतितता, स्थितीवादी, वृत्ती, भावनिक लाटांवर हेलकावे खाणारी मानसिकता, समूहशरणता इत्यादी बाबींना रोखू शकणारे बुध्दिप्रामाण्य युवकांमध्ये रुजण्यासाठी योग्य वाचन ही सर्वात मोठी उपाययोजना आहे[1]. यासाठी ग्रंथालयांची आवश्यकता आहे.

'गाव तेथे वाचनालय' या उक्तीप्रमाणे खेड्यापाड्यात सर्व ठिकाणी वाचनालये होणे गरजेचे आहे. वाचनालय हे ख-या अर्थाने गावाचे वैभव असते. शहरे तसेच खेड्यापाड्यात असणारी सार्वजनिक वाचनालये ही वाचनसंस्कृती जोपासणारी प्रमुख केंद्रेच आहेत. तसेच अनौपचारिक स्वरूपाचे लोकशिक्षण देणा-या त्या पाठशाळाच आहेत. या ज्ञानमंदिराची प्रतिष्ठा मात्र प्रत्येकाने जपली पाहिजे. गाव-प्रदेश-राज्य-राष्ट्र तसेच जागतिक पातळीवरील माहिती आपल्याला ग्रंथालयात मिळते. त्या अर्थाने ही सार्वजनिक वाचनालये आधुनिक माहिती केंद्रेच आहेत. आज मात्र काही अंशाने मान्य करावे लागते की काही वाचनालये नुसतीच मनोरंजन केंद्रे झालेली आहेत. आपल्याकडे येणारा वाचक कोणत्या प्रकारची पुस्तके वाचतो, त्याच्या अभिरुचीस वळण लावता येईल का? याचाही विचार वाचनालयांनी केला पाहिजे. वाचनालयाकडूनसुध्दा सुसंस्कृत माणूस घडविण्याची प्रकिया पूर्ण होऊ शकते.

"काळोखाचा भेद करावया निघालेत हे सकल जन
ज्ञानमंदिरी या घडवू आम्ही नव्या युगाचे बहुजन"

अशी ध्येये मनाशी ठरवून वाचनालयांनी वाटचाल केली पाहिजे. प्लेटो या विचारवंताने म्हटलेले आहे की, 'उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे निर्माण करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश आहे'. हा उद्देश सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकतो.

**वाचन व्यासंग व ग्रंथालयाची भूमिका:** वाचनाचे महत्त्व अपार आहे. वाचनामुळे आपल्या अनुभवात भर पडते. चिकित्सक वाचनातून व्यासंग वाढीस लागतो. जीवनाकडे पाहण्याचे नवनवीन दृष्टिकोन समजतात. माहितीसंग्रह होऊन माणूस बहुश्रुत होतो. ग्रंथांच्या तुलनात्मक व सखोल वाचनाने वक्तृत्वास संदर्भमोल प्राप्त होते. वाचनातून स्वत:ला व इतरांनाही आनंद देता येऊ शकतो. पुन:पुन्हा केलेल्या वाचनाने स्मरणशक्ती वाढीस लागते. वाचनाचा व्यासंग असलेल्या व्यक्तीस समाजात मान्यता मिळते. तसेच त्या व्यक्तीचे विचार निश्चित व ठाम असतात. आपली संस्कृती व परंपरा तसेच एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली? या सर्वांची माहिती ग्रंथवाचनातून मिळते. वाचकाला नवनवे शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांची माहिती मिळून



356

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67



भाषाकोश समृध्द होतो. त्यासाठी मूल्यमापनात्मक आकलनाची गरज आहे. ग्रंथवाचनातून विचार करणे, मनन–चिंतन-प्रकटीकरण इ. प्रक्रियांना चालना मिळते. "मराठी भाषा संवर्धनाच्या प्रक्रियेत प्रथमत: भाषा विषयाची मूलभूत नऊ क्षेत्रे विकसित झाली पाहिजेत."[2] 1. श्रवण, 2. भाषण, 3. वाचन, 4. लेखन, 5. आकलन, 6. कार्यात्मक व्याकरण 7. स्वयंअध्ययन, 8. भाषेचा व्यवहारात उपयोग, 9. शब्दसंपत्तीवर प्रभुत्व.

आजच्या परिस्थितीत ग्रंथालयांनी लोकमानस घडविण्याची भूमिका पार पाडली पाहिजे. गो. ग. आगरकर यांच्या मते "माहिती व करमणूक हे वाचनाचे हेतू आहेत. पुस्तके हे मित्र आहेत. वाईट मित्रांप्रमाणेच वाईट पुस्तकांचाही सहवास टाळावा. चांगल्या वाचनातून सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व आकारास येते." आगरकरांच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की वाचकाजवळ वाचनदृष्टी हवी. कारण ग्रंथ हे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या व्यक्तीला प्रेरणा देऊ शकतात, मार्गदर्शन करू शकतात.

"ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमचे हाती
ग्रंथ उजळती अज्ञान-अंधकाराच्या राती"

ग्रंथ हे जीवनात पथदर्शक व मार्गदर्शकाचीही भूमिका पार पाडतात. वाचनाने माणूस घडतो, ज्ञानाच्या कक्षा वाढतात. आजच्या स्पर्धायुगात तर असे म्हणता येईल "वाचाल तर वाचाल." समर्थ रामदासांनी अतिशय मार्मिक व योग्य शब्दांत म्हटलेले आहे.

"दिसामाजी काहीतरी ते लिहावे
प्रसंगी अखंडित वाचीत जावे."

वरील ओळींचा अर्थबोध झाल्यास 'अभ्यासोनी प्रगट व्हावे' या उक्तीचे महत्त्व समजेल; परंतु खेदाने म्हणावे लागते की, आजच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड कमी होत आहे. टी.व्ही संस्कृतीमुळे, मोबाईल संस्कृतीमुळे, वाचनसंस्कृती कमी होत आहे. यासाठी वाचनालयाने गावातील जास्तीत जास्त लोक, तरूण कसे वाचनालयात येतील, वाचक होतील यासाठी विशेष प्रयत्न करावे. आपल्या परिसरातील वाचकांची आवड व गरज लक्षात घेऊन ग्रंथसंपदा वाचनालयात ठेवावी. संशोधक तसेच अभ्यासकांना संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून द्यावेत. साक्षरता प्रसारासाठी कार्यक्रम राबवावे. व्यक्ती साक्षर झाली म्हणजे ती वाचनालयात येऊ शकेल. 'गाव तेथे वाचनालय, एक सभासद एक आलय'. म्हणजे 'घरटी एक वाचक' असा उपक्रम राबविल्यास प्रत्येक घरात वाचनालय पोहोचू शकते. समाजाचे प्रबोधन व्हावे या दृष्टिकोनातून विविध प्रकारच्या व्याख्यानमाला, परिसंवाद, चर्चासत्र आयोजित करावे. महिला, विद्यार्थी व पुरूष यांच्यासाठी वक्तृत्व, निबंध स्पर्धांचेही आयोजन करावे. प्रत्येक गावातील वाचनालय हे त्या गावाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक विकासाचे प्रमुख केंद्र व्हावे. वाचनाची चळवळ एक जनचळवळ करण्यासाठी गावागावातील ग्रंथालयांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. विविध दिनविशेषानिमित्त वक्तृत्व, निबंध, काव्यस्पर्धांचे आयोजन करून तरूणांच्याव नागरिकांच्या वाचनकौशल्यास प्रेरणा द्यावी. गावागावात, शाळा, महाविद्यालयात ग्रंथउत्सव, ग्रंथप्रदर्शन आयोजित करावे. काही वेळा ग्रंथांचे सामूहिक वाचन करावे. त्यातील अर्थ समजून सांगावा. ग्रंथांवर चर्चा घडवून आणाव्यात. त्यातूनही ग्रंथवाचनाची आवड तयार होईल.

सार्वजनिक वाचनालये ही आपल्या सर्वांनाच ज्ञानदान करणारी शाळाच असते. याठिकाणी वाचकांनी काही पथ्ये पाळली पाहिजेत. उदा. मोठ्याने वाचू नये, ग्रंथ किंवा इतर साहित्याची पाने खराब करू नये, फाडू नये, परवानगीशिवाय ग्रंथसाहित्य बाहेर नेऊ नये, वाचनालयात धूम्रपान करू नये. वाचनाखेरीज गप्पा मारत बसू नये. ही पथ्ये पाळली म्हणजे इतरांनाही त्रास होणार नाही.

**समारोप:** माणसाला चांगल्या सवयी असाव्यात. त्यापैकी वाचन हा एक चांगला छंद आहे; परंतु अश्लील पुस्तकांच्या वाचनातून विकृत मनोवृत्ती तयार होऊ शकते म्हणून सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वास पोषक असे साहित्य आपण वाचले पाहिजे. ग्रंथांच्या सान्निध्यात जीवन फुलून येते. जीवनास नवा अर्थ प्राप्त होऊ शकतो. शिव खेरा यांची You can win (यश तुमच्या हातात) Live with honour (जगा सन्मानाने जगा) आनंद यादवांचे झोंबी, शिवाजी सावंत यांची मृत्युंजय तसेच समाजसुधारकांची चरित्रे, विविध लेखकांची आत्मचरित्रेही वाचकांना प्रेरणा देण्याचे काम करतात. शिव खेरा यांच्या पुस्तकावरील वाक्य फार महत्त्वाचे आहे. "विजेते वेगळया गोष्टी करत नाही तर ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात." हे वाक्य तसेच संपूर्ण पुस्तक वाचकास प्रेरणा देते.

### संदर्भ

संपा. विजय नाहटा, लोकराज्य वाचन विशेषांक, वाचन: एक अमृतानुभव, जून-जुलै 2011, पृ. 25.
डॉ. रोहिणी तुकदेव, डॉ. प्रदीप कर्णिक, भाषिक विनिमय: तत्त्व आणि व्यवहार, पुनर्मुद्रण, मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, 2004, पृ. 2.



357